# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 22 August 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २२ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रख्यात बायोकेमिस्ट डॉ गोविंदराजन पद्मनाभन यांना पहिला विज्ञान रत्न पुरस्कार, १० जणांना विज्ञान श्री पुरस्कार, ११ जणांना युवा विज्ञान पुरस्कार, आणि अंतराळ विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या चांद्रयान तीन च्या चमुला विज्ञान टीम पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चचे प्राचार्य जयंत भालचंद्र उदगावकर यांना जीवशास्त्रासाठी, बंगळुरू इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मधले उमेश वार्ष्णेय यांना जीवशास्त्रासाठी, तर मुंबई इथल्या भाभा अणुसंशोधन केंद्राचे डॉ. आवेश कुमार त्यागी यांना अणुऊर्जा क्षेत्रातल्या योगदानासाठी विज्ञान श्री पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातले महेश काकडे यांना गणित आणि संगणक विज्ञान क्षेत्रातल्या योगदानबद्दल युवा विज्ञान पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

****

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस उद्या २३ ऑगस्टला साजरा केला जाणार आहे. यानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणाऱ्या विशेष कार्यक्रमाचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. अंतराळ राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी ही माहिती दिली. गेल्यावर्षी २३ ऑगस्टला चंद्रयान तीन मिशन अंतर्गत विक्रम लँडर चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षितरित्या उतरलं आणि हे मिशन यशस्वी झालं. भारतानं मिळवलेल्या या यशानंतर अंतराळ अर्थव्यवस्थेत पुढील दहा वर्षांत पाचपटीनं वाढ अपेक्षित असून, ही उलाढाल सुमारे ४४ अरब डॉलर्स इतकी होण्याचा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

****

कोलकाता इथं महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयनं या प्रकरणी आतापर्यंत केलेल्या तपासाची माहिती न्यायालयासमोर सादर केली. या घटनेच्या निषेधार्थ संपावर गेलेल्या डॉक्टरांना परत कामावर रुजू होण्याचं आवाहन न्यायालयानं केलं आहे.

****

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने अलीकडील काळात राज्यात काही अनुचित घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही नवीन उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय शिक्षण विभागाने जारी केला आहे.

शाळा आणि परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणं, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी, मुलींसाठी तक्रार पेटी, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समितीचं प्रस्तावित गठन, राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती, यासंदर्भातले निर्देश या शासन निर्णयात देण्यात आले आहेत. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचं उघड झाल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापनाने २४ तासाच्या आत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना माहिती द्यावी, अन्यथा संबंधित व्यक्ती अथवा संस्थेवर कारवाई करण्यात येईल, असं या शासन निर्णयात म्हटलं आहे.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची सुरक्षा देखील अत्यंत महत्त्वपूर्ण असून, यासंदर्भात तडजोड केली जाणार नाही, असं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी म्हटलं आहे.

****

येत्या रविवारी २५ ऑगस्टला होणारी, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, पुढे ढकलण्यात आली आहे. आज महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेची पुढील तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

विविध देशांमध्ये आढळून येत असलेल्या मंकीपॉक्स या विषाणुजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिलेल्या सूचनांच्या अनुषंगानं हिंगोली जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या वतीनं प्रतिबंध आणि सर्वेक्षण मोहीम राबवण्यात येत

आहे. या मोहिमेतून या आजाराविषयी नागरिकांमध्ये जागृती करण्यासह विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनांची देखभाल आणि दुरुस्ती कामांसाठी सगळ्या ग्रामपंचायतींनी स्थानिक पातळीवर जल मित्रांची निवड करावी, असं आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ यांनी केलं आहे. स्थानिक कुशल मनुष्यबळाच्या माध्यमातून दुरुस्ती आणि देखभालीची कामं तातडीनं करता येतील आणि त्यामुळे गावातल्या पाणीपुरवठा व्यवस्थेत सातत्य आणि गुणवत्ता राखली जाईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

****

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून, राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

****